N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म -

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** औरंगाबाद ग्रामीण **P.S.(ठाणे):** पिशोर **Year (वर्ष):** 2019
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0198 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 12/09/2019 21:59 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** गुरूवार **Date From (दिनांक पासून):** 01/08/2019
**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिनांक पर्यंत):** 01/08/2019
**Time From (वेळेपासून):** 15:40 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 16:10 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 12/09/2019 **Time (वेळ):** 21:40 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
**Entry No. (नोंद** 019 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 12/09/2019 21:29 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्तळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पूर्व
**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** पिशोर ,कन्नड

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नांव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**
(a) **Name (नाव):** जिंदराज गंगाधर खाजेकर
(b) **Father's/Husband's Name(वडील / पती का नाव)**
(c) **Date/Year of Birth (जन्म** 1984 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (अदा केल्याची तारीख):**
**Place of Issue (अदा केल्याची ठिकाण):**
(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**



Scanned by CamScanner

(h) **Address** (पत्ता):

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पळशी खु,कन्नड,पिशोर,औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | कळंकी,कन्नड,पिशोर,औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.): **Mobile** (मोबाइल नं.):

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | शिवाजी सखाराम जाधव | | वडील का नाम : सखाराम जाधव | 1. पिशोर,कन्नड,पिशोर,औरंगाबाद ग्रामीण, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11 **Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents** (प्रथम सूचना तथ्य ):

मी जिंदराज गंगाधर खाजेकर, वय- 35 वर्ष, व्यवसाय- हटेल, रा. ह.मु पळशी खुर्द ता. कन्नड जि. औरंगाबाद मुळ गाव कळंकी ता. कन्नड जि. ओरंगाबाद मो.नं. 9623707136.समक्ष हजर राहुन फिर्याद देतो की, मला होत असलेल्या लाचमागणी बाबतची तक्रार मी दिनांक 01/08/2019 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद येथे दिली होती, ती पुढील प्रमाणे मी वरील ठिकाणचा राहणारा असुन माझे चिकन दम बिर्यानी सेंटर या नावाचे हटेल करंजखेड फाटा, ता. कन्नड येथे असुन ते मी चालवितो. अंदाजे आठ दहा दिवसापुर्वी पिशोर पोलीस स्टेशनचे पोलीस श्री. ताठे व श्री. जाधव हे माझे हटेलवर आले होते. तेव्हा त्यांना माझे हटेलमध्ये सहा देशी दारूच्या कर्टर मिळाल्या होत्या. मिळालेल्या दारूच्या बाटल्या पोलीस श्री.ताठे व श्री.जाधव यांनी माझेकडुन ताब्यात घेवुन श्री.जाधव पोलीस मला म्हणाले की, आता तुझ्यावर अवैध दारू बाळगल्याचा गुन्हा दाखल करतो. त्यावेळी साहेब मी गरीब माणुस आहे माझ्यावर केस बिस काही करू नका अशी त्यांना विनंती केली. तेव्हा आम्ही तुझ्यावर केस करत नाही पण तु आम्हाला 2,000/- रूपये दे असे ते म्हणाले. त्यावर मी त्यांना माझेकडे एवढे पैसे नाही असे म्हणालो असता ते मला म्हणाले की, तुझी पैशाची व्यवस्था झाल्यावर येवुन भेट. तु जर आम्हाला 2,000/- रूपये दिले नाहीस तर तुझ्यावर गुन्हा दाखल करू त्यामुळे मी त्यांना नाईलाजाने हो म्हणालो होतो. पोलीस श्री. ताठे व श्री. जाधव, पिशोर पोलीस स्टेशन ता.कन्नड जि. औरंगाबाद यांना लाच देण्याची माझी ईच्छा नसल्यामुळे मी त्यांचे विरूध्द तक्रार देण्यासाठी आलो आहे. पोलीस श्री. ताठे व श्री. जाधव यांना मी लाच दिली नाही तर ते माझे विरूध्द दारू जवळ बाळगल्याचा गुन्हा दाखल करतील. पोलीस श्री. ताठे व श्री. जाधव यांचेशी माझी वैरदुष्मनी नाही किंवा देणे घेण्याचा अगर उसनवारीचा व्यवहार नाही. आज दिनांक 01/08/2019 रोजी पोलीस श्री. ताठे व श्री. जाधव यांना वर नमुद कामानिमित्त भेटण्यासाठी मी पिशोर पोलीस स्टेशन येथे जाणार आहे. तेव्हा पोलीस श्री.ताठे व श्री. जाधव यांनी माझेकडे 2,000/- रुपये लाचेची मागणी करून लाचेची रक्कम स्वत: किंवा इतरामार्फत स्वीकारल्यानंतर त्यांना पकडुन त्यांचेवर कायदेशिर कारवाई करावी हि विनंती. अशी तक्रार नोंदविली. माझे वरील तक्रारीवरुन लाचलुचपत प्रतिबंधक कार्यलिय,औरंगाबाद पोलीस निरीक्षक श्री.विकास घनवट यांनी उपलब्ध असलेले पंच 1)श्री. श्रावण खरात 2) श्री. रमेश नागमवाड यांची ओळख करून देवुन त्यांचे समक्ष लाच मागणी पडताळणी करण्याचा निर्णय घेतला. त्याप्रमाणे दिनांक 01/08/2019 रोजी श्री. ताठे व श्री. जाधव पोलीस यांची दिनांक 01/08/2019 रोजी पिशोर पोलीस स्टेशन येथे जाऊन लाचेच्या मागणीची पडताळणी पंचासमक्ष व्हाईस रेकर्डरच्या सहाय्याने करण्यात आली. पडताळणीचे वेळी श्री. ताठे पोलीस यांनी आपल्याला काहीच लागत नाही जे हे ते कायदेशीर कारवाई होणार बाकी काहीच नाही होणार असे पंचासमक्ष म्हणुन निघुन गेले व त्यांनी कोणत्याही प्रकारची लाचेची मागणी केली नाही. त्यानंतर श्री. जाधव पोलीस मला चला चहा घेऊ असे म्हणून पिशोर बसस्टँण्ड जवळील हाँटेल न्यू जगदंबा येथे घेऊन गेले.तेव्हा त्यांनी माझ्याकडे अवैध दारु बाळगल्याबाबत गुन्हा दाखल न करण्यासाठी 2,000/- रूपये लाचेची मागणी करून तडजोडी अंती 1,500/- रुपये लाचेची रक्कम स्विकारण्याचे 15.40 ते 16.10 वा. च्या दरम्यान पंचासमक्ष मान्य केले. श्री. जाधव



Scanned by CamScanner

पोलीस यांनी ती लाचेची रक्कम मला अर्ध्या तासात पिशोर पोलीस स्टेशन येथे घेवुन बोलावले. त्यावरुन श्री. जाधव पोलीस यांना लाच म्हणून देण्या करीता मी हजर केलेल्या 500/- रु दराच्या 03 नोटांना ऍन्थ्रसीन पावडर लावून माझे पन्टचे समोरील उजव्या खिशात ठेवण्यात आल्या. माझे कडे व्हईस रेकर्डर देवून माझे सोबत पंच क्र.1 श्री. श्रावण खरात यांना श्री. जाधव पोलीस यांची भेट घेण्याकरीता पिशोर पोलीस स्टेशन येथे पाठविण्यात येवून सापळा आयोजित करण्यात आला. त्यावेळी श्री. जाधव पोलीस हे पोलीस स्टेशन पिशोर येथे नसल्याने त्यांना मी मोबाईलवरून संपर्क केला असता त्यांनी पिशोर पोलीस स्टेशन बाहेरील चहाचे हटेल मध्ये थांबण्याचे सांगितले असता थोड्याच वेळात श्री. जाधव पोलीस आम्ही थांबलेल्या हटेल न्यु जगदंबा येथे आले. त्यावेळी श्री. जाधव पोलीस यांनी ताठे साहेब अन त्यात आपला काही संबंध नाही तुमचं तुम्ही पहा असे म्हणुन लाचेची रक्कम न स्विकारता निघुन गेले. त्यानंतर तसा सविस्तर सापळा स्थगिती पंचनामा करून सदर प्रकरणाबाबत गोपनीयता बाळगणे बाबत सुचना देवुन श्री.जाधव पोलीस अगर श्री.ताठे पोलीस यांनी पुन्हा लाचेची मागणी केल्यास लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, औरंगाबाद येथे संपर्क करणेबाबत मला पो.नि श्री.घनवट यांनी कळविले होते.त्यानंतर दिनांक 06/08/2019 रोजी श्री. ताठे पोलीस यांनी मला माझे हटेलवर येवुन पैशाची मागणी करून आता पैसे आहेत का ? असे म्हणाले त्यावर त्यांना मी दवाखाण्यात गेलो होतो त्यात पैसे खर्च झाले आहेत असे म्हणालो असता त्यांनी मग नंतर दे असे म्हणुन निघुन गेले होते. त्यामुळे दिनांक 09/08/2019 रोजी मी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयात गेलो असता पो.नि श्री.घनवट यांनी माझा सविस्तर जबाब नोंदवुन घेतला व श्री. ताठे पोलीस यांनी परत पैशाची मागणी केल्यास संपर्क करणेबाबत कळविले होते. परंतु त्यानंतर श्री. ताठे व श्री. जाधव पोलीस मला दोन वेळेस पिशोर येथे भेटले त्यांनी मला बोलण्यास टाळाटाळ करून निघुन गेले. श्री. ताठे व श्री. जाधव पोलीस यांना माझेबाबत संशय आलेला असावा असे वाटल्याने त्याबाबत मी दिनांक 11/08/2019 रोजी पो.नि श्री. घनवट यांना मोबाईलवर कळविले होते. त्यानंतर दिनांक 20/08/2019 रोजी मी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय येथे जावुन श्री. ताठे व श्री. जाधव पोलीस यांना माझेवर संशय आलेला असावा त्यामुळे श्री. ताठे पोलीस आता माझेकडे पैशाची मागणी करून पैसे स्विकारतील असे मला वाटत नाही. तसेच श्री. जाधव पोलीस यांनी या अगोदर माझ्याकडे मागणी केलेली 1,500/- रुपये लाचेची रक्कम माझेकडुन स्विकारतील असे मला वाटत नाही असे पोलीस निरीक्षक श्री. घनवट यांना कळविले तसा माझा सविस्तर जबाब पो.नि श्री. घनवट यांनी नोंदविला आहे. तसेच मला श्री जाधव यांचे पूर्ण नाव श्री शिवाजी सखाराम जाधव पोलीस नाईक असे असल्याचे समजले आहे.अशा प्रकारे श्री शिवाजी सखाराम जाधव पोलीस नाईक पिशोर पोलीस स्टेशन यांनी दिनांक 01/08/2019 रोजी 15.40 ते 16.10 वा. च्या दरम्यान पिशोर बसस्टँण्डजवळील हॉटेल न्यू जगदंबा येथे माझ्याकडे अवैध दारु बाळगल्याबाबत गुन्हा दाखल न करण्यासाठी 2,000/- रूपये लाचेची मागणी करून तडजोडी अंती 1,500/- रुपये लाचेची रक्कम स्विकारण्याचे पंचासमक्ष मान्य केले आहे. म्हणुन माझी त्यांचे विरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालवरून अपराध घडल्याचे.)

**(1) Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): Jagdish Madhukar Pawar(I (Inspector)) / PCMH91782 **or**

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे **Rank** (पद):

**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or**

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला ख़बरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)



Scanned by CamScanner

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name (नाम):** Jagdish Madhukar Pawar
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** PCMH91782

पोलीस ठाणे अंमलदार
पो. स्टे. पिशोर



Scanned by CamScanner